**RNI No. MAHBIL /2009/31748**
**Reg. No. MH/MR/South-324/2010-12**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

**वर्ष १, अंक ५]** **मंगळवार, मार्च ३१, २००९/चैत्र १०, शके १९३१** **[पृष्ठे २७, किंमत : रुपये २०.००**

**असाधारण क्रमांक २२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लोखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ३०० ०३२, दिनांक ३१ मार्च २००९

**अधिसूचना**

**राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९.**

**भारतीय संविधानाच्या भाग नऊ व नऊ (अ) अनुसार गठित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता राजकीय पक्षांची नोंदणी करणे व इतर अनुषंगिक बाबींविषयीचे आदेश.**

क्रमांक एसईसी/२००९/सीआर-४९/का. ११.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाद्वारे व राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यातील तरतुदीन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांचे अधिक्षण, संचालक व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पावित्र्य राखणे व अशा निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे, प्रभावीपणे व कार्यक्षमतेने पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांची नोंदणी व संबंधित बाबींची तरतूद करणे गरजेचे आणि आवश्यक झाल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचना क्र. एसईसी/२००८/सीआर-२६/का-११, दिनांक १४ मे २००८ (वेळोवेळी सुधारित केल्यानुसार) अन्वये राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप आदेश, २००८ निर्गमित केले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर आदेशामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे. अशी आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, आता, सदर राजकीय पक्षांची नोंदणी व चिन्हांचे वाटप आदेश, २००८ या आदेशांचे अधिक्रमण करून राज्य निवडणूक आयोग, राजकीय पक्षांची नोंदणी संबंधात खालील आदेश देत आहे :—

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.—** (१) या आदेशाला महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ असे म्हटले जाईल.

(२) त्याची व्याप्ती महाराष्ट्र राज्यभर राहील.

(३) तो, राजकीय पक्षाच्या आधारावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घेतल्या जाणाऱ्या सर्व निवडणुकांकरिता लागू राहील व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांना, जेथे पक्षविरहित निवडणुका घेतल्या जातात, तेथे हा आदेश लागू होणार नाही.

(४) सदर आदेश तात्काळ अंमलात येईल.

(५) हा आदेश अंमलात येण्यापूर्वी महाराष्ट्र राजकीय पक्षांचे नोंदणी व चिन्हांचे वाटप, २००८ अन्वये राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेल्या सर्व राजकीय पक्षांची नोंदणी ह्या आदेशानुसार झाल्याचे समजण्यात येईल.

## भाग एक

## प्रारंभिक

२. **व्याख्या.——** या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,——

(१) " आयोग " म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेड ए अन्वये गठित राज्य निवडणूक आयोग.

(२) " भारत निवडणूक आयोग " म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये गठित भारत निवडणूक आयोग.

(३) " स्थानिक स्वराज्य संस्था " म्हणजे,——

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये गठित पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद, किंवा

(ब) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये गठित नगर परिषदा किंवा नगर पंचायती, किंवा

(क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये गठित महानगरपालिका.

(४) " परिच्छेद " म्हणजे या आदेशातील परिच्छेद.

(५) " मान्याताप्राप्त राजकीय पक्ष " म्हणजे भारत निवडणूक आयोगाद्वारे काढण्यात आलेल्या निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८, आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा अन्वये राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेला आणि तसेच, राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविण्यात आलेला राष्ट्रीय पक्ष किंवा राज्यस्तरीय पक्ष ;

(६) " नोंदणीकृत राजकीय पक्ष " म्हणजे आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेला राजकीय पक्ष.

(७) " राज्य " म्हणजे महाराष्ट्र राज्य.

(८) सदर आदेशात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व वाक्यप्रयोग यांना राज्यातील सध्या अस्तित्त्वात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमांत किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमांद्वारे जे अर्थ दिले असतील तेच अर्थ प्राप्त होतील.

## भाग दोन

## राजकीय पक्षांची नोंदणी

३. **राजकीय पक्षांची नोंदणी.——** (१) कोणतीही संस्था किंवा राजकीय पक्ष म्हणून स्वतःस म्हणवून घेणाऱ्या व्यक्तिगत नागरिकांची संस्था किंवा भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच नोंदणी झालेला राजकीय पक्ष, ज्याला या आदेशाच्या तरतुदीचा फायदा घ्यावयाचा आहे अशी संस्था किंवा पक्ष, राज्य निवडणूक आयोगाकडे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या प्रयोजनाकरिता राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्यासाठी स्वतःहून अर्ज करील. अर्जाचा नमुना परिशिष्ट-एक किंवा दोन (जे लागू असेल) नुसार असेल आणि त्यासोबत परिशिष्ट-तीन नुसार घोषणापत्र असेल.

(२) उप-परिच्छेद (१) अन्वये केलेल्या प्रत्येक अर्जावर संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्षाचे सचिव/सभापती/अध्यक्ष किंवा कोणत्याही नावाने ओळखले जाणारे संघ अथवा संस्था अथवा राजकीय पक्ष यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असावी. अर्ज आयोगाच्या सचिवांकडे सादर करावे किंवा ते नोंदणीकृत डाकेने पाठवावे.

परंतु मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे बाबतीत अर्जावर उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही राज्यस्तरीय पदाधिकारी यांची स्वाक्षरी असेल.

(३) अशा प्रत्येक अर्जात खालील तपशीलांचा अंतर्भाव असावा, ते पुढीलप्रमाणे :—

(अ) संघ, संस्था किंवा राजकीय पक्ष यांचे नाव.

(ब) त्यांच्या मुख्य कार्यालयाचे ठिकाण.

(क) पत्रे पाठविण्याचा व इतर संपर्क साधण्याचा पत्ता.

(ड) त्याचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांची नावे व त्यांच्या निवडीबाबत पक्षाच्या ठरावाची प्रत.

(इ) त्यांच्या सदस्यांचे संख्याबळ व त्यांच्या सदस्यांचा संवर्ग असल्यास त्या प्रत्येक संवर्गाचे विद्यमान संख्याबळ कमीत कमी १५० असावे. सदस्यांची नावे व त्यांचे मतदार यादीतील नोंदणीबाबतचा अद्ययावत प्रमाणित तपशील द्यावा.

(फ) जर त्यांचे कोणतेही स्थानिक युनिट (शाखा) असेल तर त्याचा स्तर कोणता.

(ग) जर, राज्यातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचे कोणतेही पदाधिकारी किंवा सदस्य त्यांचे प्रतिनिधित्व करीत असेल, तर त्यांची संख्या आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था व ते धारण करीत असलेल्या पदांशी संबंधित तपशील.

(ह) त्यांची भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच राजकीय पक्ष म्हणून नोंदणी झाली आहे का, असल्यास, त्यांना राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता आहे की, राज्यातील पक्ष म्हणून मान्यता आहे ते नमूद करावे :

परंतु, मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे बाबतीत फक्त मुद्दा (अ), (ब), (क), (ड) आणि (ह) बाबतचा तपशील आवश्यक असेल. तथापि, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी त्यांच्या राज्यस्तरिय कार्यालयाचा पत्ता द्यावा.

(४) (अ) उप-परिच्छेद (१) अन्वये सादर करण्यात येणाऱ्या अर्जाबरोबर संघ किंवा संस्था ज्या नावाने ओळखली जात असेल त्यांच्या अध्यक्ष, सचिव व इतर तीन संस्थापक सदस्यांची स्वाक्षरी असलेली निवेदनाची किंवा निय/विनियमांची प्रत देण्यात यावी ; व अशा निवेदन किंवा नियम, विनियम यात संघ किंवा संस्था कायद्यानुसार तयार झालेल्या भारतीय संविधानावर दृढ विश्वास व निष्ठा असल्याची आणि समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही आणि भारताची प्रभुत्व संपन्नता, एकता व एकात्मता मान्य असल्याच्या तत्त्वांची विशेष तरतूद केलेली असावी :

परंतु, मान्यतांप्राप्त राजकीय पक्ष यांचेबाबतीत निवेदन किंवा नियम आणि विनियम यावर राष्ट्रीय स्तरावरील किंवा राज्यस्तरिय कार्यकारिणीतील कोणत्याही तीन सदस्यांची स्वाक्षरी असेल.

अशा निवेदनात किंवा नियम/विनियम यात तिच्या अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांची निवड लोकशाही पद्धतीने केली जाईल असा व अशा निवडींचा कालावधी किती असेल या तरतुदीचा स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे.

(ब) भारत निवडणूक आयोगाकडे यापूर्वीच राजकीय पक्षाची नोंदणी झाली असल्यास, त्या अर्जाबरोबर भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्याचा कागदोपत्री पुरावा, चिन्हांचा तपशील व पक्षांच्या घटनेची प्रमाणित प्रत इत्यादी देण्यात यावे.

(५) तसेच अर्जदाराने या आदेशातील तरतुदींचे वाचन केले असून, ते त्याला समजले आहे व नोंदणी करणारा राजकीय पक्ष या आदेशातील तरतुदींचे पालन करेल असे घोषणापत्र अर्जासोबत जोडावे.

(६) अर्जासोबत " असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन, महाराष्ट्र, मुंबई " यांच्या नावे रुपये ५,००० (रुपये पाच हजार फक्त) चा मुंबई येथे देय धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) जोडलेला असावा.

(७) संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्षांकडून आवश्यक वाटेल अशा स्वरूपाचा इतर तपशील आयोग मागवू शेकल.

(८) अर्ज प्राप्त होताच उक्त सर्व तपशिलांचा व इतर आवश्यक आणि संबंधित बाबींचा विचार करून आणि संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांच्या प्रतिनिधींना त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन, आयोग या आदेशाच्या प्रयोजनार्थ संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांना राजकीय पक्ष म्हणून काही मर्यादा व अटी पाळण्याचे विनिर्दिष्ट आदेश देऊन त्यांची नोंदणी करेल, किंवा त्यांची नोंदणी करता येणार नाही, असा निर्णय संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांना निवडणूक आयोगांकडून कळविण्यात येईल :

परंतु, असे की, जर वरील परिच्छेद (४) मधील तरतुदींशी अशा संघ किंवा संस्थाचे नियम व विनियम यांचे निवेदन किंवा राजकीय पक्षाची घटना जुळत नसल्यास वरील उप-परिच्छेदान्वये संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांची राजकीय पक्ष म्हणून नोंदणी केली जाणार नाही.

(९) (एक) या आदेशान्वये राजकीय पक्षाची नोंदणी करण्यापूर्वी **महाराष्ट्र शासन राजपत्रात** पक्षाचे नाव आणि पत्ता, त्याचे अध्यक्ष व त्यांना जर चिन्ह देण्यात येणार असेल तर ते चिन्ह यांचा अंतर्भाव असलेली पूर्व सूचना प्रसिद्ध करण्यात येईल व सर्वसाधारण जनतेकडून अशा नोंदणीबाबतच्या हरकती मागविण्यात येतील :

परंतु, मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचे बाबतीत अशी पूर्व सूचना प्रसिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही.

(दोन) वरील परिच्छेद (एक) मध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार **महाराष्ट्र शासन राजपत्रात** पूर्व सूचना प्रसिद्ध केलेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास राज्य निवडणूक आयोग पूर्व सूचनेत प्रस्तावित केल्याप्रमाणे राजकीय संस्थेची नोंदणी करण्याकरिता सक्षम राहील.

(तीन) जर कोणतीही हरकत प्राप्त झाली, तर तिचा राज्य निवडणूक आयोग विचार करेल व ती शुल्लक आढळल्यास फेटाळण्यात येईल व राजकीय पक्षाची नोंदणी करण्यात येईल. दुसरे असे की, राज्य निवडणूक आयोगास हरकतीत प्रथमदर्शनी सत्य वाटले, तर ती अर्जदारास

कळविण्यात येईल आणि त्यावर त्याचे अभिप्राय मागविण्यात येतील. अभिप्राय प्राप्त झाल्यावर, आयोग उपलब्ध अभिलेखाच्या आधारावरील गुणवत्तेवर निर्णय घेईल किंवा संबंधित पक्षांचे म्हणणे ऐकूण त्यानंतर निर्णय घेईल. राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

(चार) सदर आदेशान्वये प्रत्येक व्यक्तिगत नागरिकांच्या संस्था किंवा संघ यांनी त्यांना राजकीय पक्ष नोंदणी करण्याकरिता अर्ज सादर करताना प्रस्तावित राजकीय पक्षाचे नाव हे यापूर्वी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविल्या गेलेल्या राजकीय पक्षाच्या नावासारखे असता कामा नये, म्हणजे सर्वसाधाराण जनतेच्या मनात त्याबाबत संभ्रण निर्माण होता कामा नये, याची काळजी घ्यावी. राज्य निवडणूक आयोगास तसे आढळल्यास किंवा सर्वसाधारण जनतेकडून आलेल्या हरकतींनुसार राजकीय पक्षाने नोंदणीकरिता घेतलेले नाव यापूर्वीच नोंदणी करण्यात आलेल्या पक्षाच्यासारखे वाटल्यास आयोग स्वतःच्या अधिकारात अर्ज नाकारण्यास सक्षम राहील. तथापि, राजकीय पक्षाचे नाव बदलून नवीन अर्ज सादर करता येईल. व अशा कोणत्याही अर्जावर तो नवीन अर्ज म्हणून नव्याने पुन्हा तपासणी केली जाईल. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचा निर्णय अंतिम राहील.

(१०) उक्त संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांची राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्यात आल्यावर,—

(अ) त्यांनी त्यांच्या नावामधील बदल तसेच मुख्य कार्यालय, पदाधिकारी, पत्ता किंवा इतर कोणत्याही संबंधित प्रकरणीचा बदल आयोगाला विनाविलंब कळवावा :

परंतु, त्यांनी त्यांच्या नावांमधील कोणाताही बदल करण्यापूर्वी आयोगाची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता राहील.

(ब) अशा संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांनी त्यांचे मिळकत व खर्च यांचे हिशोब योग्य रीतीने ठेवावेत, आणि विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर करण्यात आलेला खर्च, पक्षाच्या सर्वसाधारण प्रसिद्धीवर करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील दर्शविणारा खर्च व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उभा करण्यात आलेल्या ठराविक उमेदवारांच्या किंवा पक्षाद्वारे पाठिंबा देण्यात आलेल्या उमेदवारांच्या प्रचाराकरिता करण्यात आलेल्या खर्चाचे उमेदवारनिहाय वेगळे हिशोब ठेवावेत.

(क) पक्षाच्या वार्षिक लेखापरिक्षित लेख्याची एक प्रत व संबंधित वर्षातील कायद्यान्वये भरलेल्या आयकर विवरणाची (रिटर्नची) एक प्रत संबंधित वित्तीय वर्ष संपल्यापासून एका वर्षाच्या आत आयोगाच्या कार्यालयात देण्यात यावी.

(ड) आयोगाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता असलेल्या आदर्श आचारसंहितेमधील तरतुदींचे पालन करावे.

(इ) निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे व शांततेने पार पाडणे किंवा विशेषतः सर्वसाधारण जनतेच्या व प्रामुख्याने मतदारांच्या हिताच्यादृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे व सूचनांचे पालन करावे.

**४. नोंदणीकृत राजकीय पक्षांची नोंदणी रद्द करणे.—** (१) या आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, या आदेशातील तरतुदींअन्वये नोंदणीकृत झालेल्या एखाद्या राजकीय पक्षांकडून,——

(अ) या आदेशातील तरतुदींची पूर्तता होत नसल्याचे, किंवा

(ब) वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार अंमलात आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता असलेल्या आदर्श आचारसंहितेचे पालन होत नसल्याचे, किंवा

(क) निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे व शांततेने पार पाडणे किंवा सर्वसाधारण जनतेच्या व विशेषतः निवडणूक क्षेत्राच्या हिताच्या दृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे व सूचनांचे पालन होत नसल्याचे, किंवा

(ड) अशा आदर्श आचारसंहितेची, निदेशाची अथवा सूचनांची अवहेलना केली असल्याचे,

एखाद्या अर्जाद्वारे अथवा स्वतःहून राज्य निवडणूक आयोगाच्या निदर्शनास अल्यास, आयोग अशा प्रकरणी सर्व उपलब्ध मुद्दे किंवा परिस्थितीचा विचार करून व अशा पक्षांच्या विरोधात घ्यावयाच्या प्रस्तावित कार्यवाहीच्या संबंधातील कारणांचा खुलासा करण्याची संबंधित पक्षाला संधी दिल्यावर, आयोगाला त्याबाबतची कारणे योग्य न वाटल्यास आयोग अशा पक्षांची नोंदणी रद्दबातल ठरवून अशा पक्षाचे नाव आयोगाकडील नोंदणीकृत पक्षाच्या यादीतून काढून टाकू शकेल.

(२) एखाद्या नोंदणीकृत राजकीय पक्षाने स्वतःहून त्या पक्षाची नोंदणी रद्द करण्याबाबत आयोगाकडे अर्ज दाखल केल्यास व त्या पक्षाच्या सदस्यांनी बहुमताने तसा ठराव मंजूर केल्याची आयोगाची खात्री पटल्यास, आयोग अशा पक्षाची नोंदणी रद्द करू शकेल.

**५. सूचना देण्याबाबतचे आयोगाचे अधिकार.——** आयोग खालील बाबतीत सूचना व निदेश देऊ शकेल :—

(अ) या आदेशातील कोणत्याही तरतुदींबाबतच्या स्पष्टीकरणाकरिता ;

(ब) अशा कोणत्याही तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात उत्पन्न झालेल्या कोणत्याही अडचणी दूर करण्याकरिता ;

(क) राजकीय पक्षांची नोंदणी करणे या संबंधात, या आदेशात तरतूद करण्यात आली नसेल किंवा करण्यात आलेली तरतूद अपूर्ण असेल तेव्हा त्यासंबंधात योग्य ती तरतूद करणे, आणि निवडणूका सुरळीत व सुव्यवस्थित पार पाडण्याच्या दृष्टीने योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत झाल्यास.

## परिशिष्ट एक

## राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याकरिता अर्जाचे प्रारूप

(केवळ मान्यताप्राप्त पक्षांकरिता)

प्रति,

प्रधान सचिव/सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर

मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

महोदय,

.................................................................................... (राजकीय पक्षाचे नाव) कडून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या " राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ " अन्वये राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे. सदर आदेशान्वये आवश्यक असलेला तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :—

(१) मान्यताप्राप्त राष्ट्रीय/राज्यस्तरीय पक्षाचे नाव :

(२) त्यांच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता :

(३) त्यांच्या राज्य पातळीवरील कार्यालयाचा पत्ता :

(४) पत्र पाठविण्याचा व इतर संपर्क साधण्याचा पत्ता :

(५) त्याचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांची नावे :

(२) यासोबत खालील कागदपत्रे/तपशील जोडण्यात येत आहे :—

(एक) प्रक्रिया शुल्क म्हणून " असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन, महाराष्ट्र मुंबई " यांच्या नावे मुंबई येथे देय असलेला रुपये १०,००० (रुपये दहा हजार) चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट).

(दोन) राजकीय पक्षाची घटना/निवेदन, नियम आणि विनियमांची संघ किंवा संस्था किंवा पक्षाच्या राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील कार्यकारिणीतील कोणत्याही तीन सदस्यांची स्वाक्षरी असलेली प्रत जोडण्यात आली आहे. अशा घटना, निवेदन, नियम किंवा विनियम यात संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांच्या कायद्यानुसार तयार झालेल्या, भारतीय संविधानावर दृढ विश्वास, निष्ठा असल्याची आणि समाजवाद, धर्म निरपेक्षता व लोकशाही आणि भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता मान्य असल्याच्या तत्त्वांची विशेष तरतूद केलेली आहे.

अशा घटनेत/निवेदनात किंवा नियम/विनियम यात तिच्या अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांची निवड लोकशाही पद्धतीने केली जाईल असा व अशा निवडीचा कालावधी किती असेल त्या तरतुदीचा, स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

(तीन) भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणी केल्याचा कागदोपत्री पुरावा (आणि चिन्ह वाटप करण्यात आले असल्यास) चिन्ह वाटपाच्या आलेल्या अधिसूचनेची प्रत जोडण्यात आली आहे.

(चार) परिशिष्ट तीन मध्ये नमूद केल्याप्रमाणे घोषणापत्र जोडण्यात आले आहे.

ठिकाण : आपला विश्वासू,

दिनांक : पक्षांचे सचिव/सभापती/अध्यक्ष.

## परिशिष्ट दोन

## राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याकरिता अर्जाचे प्रारूप

(मान्यताप्राप्त पक्ष वगळता इतर संघ/संस्था/राजकीय पक्षांकरिता)

प्रति,

प्रधान सचिव/सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,

मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

महोदय,

.................................................................................... (राजकीय पक्षाचे नाव) कडून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या " राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ " अन्वये राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्याची विनंती करण्यात येत आहे. सदर आदेशान्वये आवश्यक असलेला तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :—

(ए) संघ/संस्था/राजकीय पक्ष याचे नाव :

(बी) त्यांच्या मुख्य कार्यालयाचा पत्ता :

(सी) त्यांच्या राज्य पातळीवरील कार्यालयाचा पत्ता :

(डी) पत्र पाठविण्याचा व इतर संपर्क साधण्याचा पत्ता :

(इ) त्यांचे अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व इतर पदाधिकाऱ्यांची नावे व त्यांच्या निवडीबाबतच्या पक्षाच्या ठरावाची प्रत :

(एफ) त्यांच्या सदस्यांचे संख्याबळ व त्यांच्या सदस्यांचा संवर्ग असल्यास, त्या प्रत्येक संवर्गाचे संख्याबळ :

(जी) कमीतकमी १५० सदस्यांची नावे, त्यांचा संवर्ग व मतदार यादीतील त्यांच्या नावाबाबतचा अद्ययावत प्रमाणित तपशील :

(एच) त्यांची कोणतीही शाखा (युनिट) असेल, तर अशा शाखेचा (युनिटचा) स्तर :

(आय) संघ/संस्था/राजकीय पक्षाचे बाबतीत जर, राज्यातील कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा कोणताही पदाधिकारी किंवा सदस्य त्याचे प्रतिनिधीत्व करीत असेल, तर त्यांची संख्या, स्थानिक स्वराज्य संस्थांची नावे व त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थामधील असलेल्या पदाधिकारी व सदस्यांची संख्या :

(जे) संघ/संस्था/राजकीय पक्ष यांचा स्थापनेचा दिनांक :

(के) संघ/संस्था/राजकीय पक्ष ज्या आधारावर आहे ती तत्त्वे :

(एल्) पालन करीत असलेल्या किंवा पाळण्यात यावयाच्या धोरणांची ध्येय व उद्दिष्टे :

(एम्) त्यांची तत्त्वे, धोरणे, ध्येय व उद्दिष्टे पाळण्याकरिता असलेल्या प्रयोजनाकरिता असलेले कार्यक्रम कार्ये व कामे :

(२) यासोबत खालील कागदपत्रे/तपशील जोडण्यात येत आहे :—

(एक) प्रक्रिया शुल्क म्हणून " असिस्टंट कमिशनर, स्टेट इलेक्शन कमिशन, महाराष्ट्र, मुंबई " यांच्या नावे मुंबई येथे देय असलेला रुपये १०,००० चा (रुपये दहा हजार) धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट).

(दोन) राजकीय पक्षाची घटना/निवेदन, नियम आणि विनियमांची संघ किंवा संस्था किंवा पक्षाच्या राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील कार्यकारिणीतील कोणत्याही तीन सदस्यांची स्वाक्षरी असलेली प्रत जोडण्यात आली आहे. अशा घटना, निवेदन, नियम किंवा विनियम यात संघ किंवा संस्था किंवा राजकीय पक्ष यांच्या कायद्यानुसार तयार झालेल्या, भारतीय संविधानावर दृढ विश्वास, निष्ठा असल्याची आणि समाजवाद, धर्म निरपेक्षता व लोकशाही आणि भारताचे सार्वभौमत्व, एकता व एकात्मता मान्य असल्याच्या तत्त्वांची विशेष तरतूद केलेली आहे.

अशा घटनेत/ निवेदनात किंवा नियम/विनियम यात तिच्या अध्यक्ष, सचिव, कोषाध्यक्ष व इतर पदाधिकारी यांची निवड लोकशाही पद्धतीने केली जाईल असा व अशा निवडीचा कालावधी किती असेल त्या तरतुदीचा, स्पष्ट उल्लेख केलेला आहे.

(तीन) परिशिष्ट तीन मध्ये नमूद केल्याप्रमाणे घोषणापत्र जोडण्यात आले आहे.

ठिकाण : आपला विश्वासू,

दिनांक : पक्षांचे सचिव/सभापती/अध्यक्ष.

**परिशिष्ट तीन**

(घोषणापत्राचा नमुना)

**घोषणापत्र**

प्रति,

प्रधान सचिव/सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर

मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२.

महोदय,

मी ................................................................. (अर्जदाराचे नाव) ................................................................. (संघ/संस्था/राजकीय पक्ष यांचे नाव) च्या वतीने अशी घोषणा करतो की, मी, महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ या आदेशातील तरतुदींचे वाचन केले असून, ते मला समजले आहे. त्याचप्रमाणे उपरोक्त पक्ष राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडून नोंदणीकृत झाल्यास, सदर पक्ष :—

(१) भारतीय संविधानावर दृढ विश्वास, निष्ठा राखून आणि समाजवाद, धर्मनिरपेक्षता व लोकशाही, भारतीय सार्वभौमत्व, एकता व एकात्मता या तत्त्वांना बांधील राहील.

(२) राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वेळोवेळी आदर्श आचारसंहितेसंदर्भात दिलेल्या तरतुदींचे पालन करील, तसेच या आदेशातील तरतुदींचे पालन करील.

(३) निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे व शांततेने पार पाडणे किंवा सर्वसाधारण जनतेच्या व विशेषतः निवडणूक क्षेत्राच्या हिताच्या दृष्टीने आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांचे व सूचनांचे पालन करेल, जेणेकरून अशा निवडणुका न्याय्य व निर्भर वातावरणात पार पडून सामान्य नागरिक व मतदारांच्या हितांचे रक्षण होईल.

(४) पक्षाच्या नावामधील बदल तसेच मुख्य कार्यालय किंवा राज्य कार्यालयाचा पत्ता, पक्षाच्या राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील पदाधिकाऱ्यांची नावे किंवा इतर कोणताही संबंधित प्रकरणीचा बदल विनाविलंब आयोगाला कळवील :

परंतु, असा नावामधील बदल करण्यापूर्वी पक्ष आयोगाची पूर्वपरवानगी घेईल.

(५) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांसाठी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांची नावे आयोग व संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांची नावे व सहीचा नमुना आयोगास कळवील.

मी, पुढे असेही घोषित करतो की, या घोषणापत्रातील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातील कोणताही भाग खोटा नसून, आयोगापासून कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही.

(सही)

ठिकाण :

दिनांक : पक्षांचे सचिव/सभापती/अध्यक्ष.

**नन्द लाल,**

राज्य निवडणूक आयुक्त,

महाराष्ट्र.

## STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

1st Floor, New Administrative Building, Opposite Mantralaya,
Madam Cama Road, Mumbai 400 032,
dated the 31st March 2009

*NOTIFICATION*

THE REGISTRATION OF POLITICAL PARTIES ORDER, 2009.

An order to provide for the registration of political parties at elections to the local bodies constituted in Maharashtra in pursuance of Parts IX and IXA of the Constitution of India and for matters connected therewith.

No. SEC/2009/CR-49/D-11.—Whereas, the superintendence, direction and control of all elections to local bodies in the State are vested in the State Elections Commission by virtue of the provisions of the Constitution of India and the relevant laws relating to local bodies in the State ;

And whereas, with a view to provide, in the interest of sanctity of elections to the local bodies and in the interest of conduct of such elections in a free, fair, effective and efficient manner, for the registration of political parties and for matters connected therewith, the State Election Commission under its Notification No. SEC/2008/CR-24/D-11, dated 14th May 2008 had issued the Registration of Political Parties and Allotment of Symbols Order, 2008 (as amended from time to time) ;

And whereas, the Commission is satisfied that, it is expedient to amend the said Order ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Article 243-K read with Article 243-ZA of the Constitution of India, the State Election Commission, in supersession of the Registration of Political Parties and Allotment of Symbols Order, 2008, hereby makes the following order :—

**1. Short title, extent, application and commencement.—**(1) This Order may be called the Maharashtra Registration of Political Parties Order, 2009.

(2) It extends to the whole of the State of Maharashtra.

(3) It shall apply to all elections to local bodies in the State held on party basis. It shall not apply to Village Panchayats elections where elections are held on partyless basis.

(4) It shall come into force with immediate effect.

(5) The political parties already registered under the Registration of Political Parties and Allotment of Symbols Order, 2008, shall be deemed to have been registered under this Order.

### PART I

PRELIMINARY

**2. Definitions.—**In this Order, unless the context otherwise requires,—

(1) " Commission " means the State Election Commission constituted under Article 243-K read with Article 243-ZA of the Constitution of India ;

(2) " Election Commission of India " means the Election Commission of India constituted under Article 324 of the Constitution of India ;

(3) " local body " means,—

(a) a Zilla Parishad or Panchayat Samiti constituted under the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 ;or

(b) a Municipal Council or Nagar Panchayat constituted under the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 ; or

(c) a Municipal Corporation constituted under the Mumbai Municipal Corporation Act, 1888 ; or City of Nagpur Corporation Act, 1948 ; or the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949.

(4) " paragraph" means a paragraph of this Order ;

(5) " recognised political party " means a political party recognised by the Election Commission of India as a National Party or as a State Party under the Election Symbols (Reservation and Allotment) Order, 1968 (as amended from time to time) and also registered with the Commission ;

(6) " registered political party " means a political party registered with the Commission ;

(7) " State " means the State of Maharashtra ;

(8) Word and expressions used but not defined in this Order, but defined in any State Act for the time being in force, or the rules made thereunder, shall have the meanings respectively assigned to them in those Acts and Rules.

## PART II

### Registration of Political Parties

**3. Registration of Political Paties.—** (1) Any association or body of individual citizens calling itself a political party, or a political party already registered with the Election Commission of India, and intending to avail itself of the provisions of this Order, shall make an application to the State Election Commission for its registration as a political party for the purposes of elections to local bodies in the State. The application should be in proforma as provided in Annexures I or II, as the case may be, and it shall be accompanied by a declaration as provided in Annexure III.

(2) Every application under sub-paragraph (1) shall be signed by the General Secretary/ Chairman/President of the association or body or political party or Chief Executive Officer of the association or body or political party by whatever name known and presented to the Secretary to the Commission or sent by registered post :

Provided that in case of recognised Political Party it may be signed by any State Level office bearer as mentioned in above paragraph.

(3) Every such application shall contain the following particulars, namely :—

(*a*) the name of the association or body or political party ;

(*b*) location of its head office ;

(*c*) the address to which letters and other communications meant for it should be sent ;

(*d*) the names of its President, Secretary, Treasurer and other office-bearers and copy of resolution of their election ;

(*e*) the numerical strength of its members and if there are categories of its members, the numerical strength in each category. The existing numerical strength should be 150 minimum. The names of the members and recently certified details about their registration in electoral rolls should be enclosed.

(*f*) whether it has any local units (branches) ; if so, at what levels ;

(*g*) whether it is represented by any office-bearers or members in any of the local bodies in the State ; if so, their number and particulars relating to the office they are holding and the local body concerned ;

(*h*) whether it has already registered itself as a political party with the Election Commission of India, and if so, whether it is recognised as a National Party or a State Party :

Provided that in case of recognised political Party the details as mentioned at (*a*), (*b*), (*c*), (*d*) and (*h*) shall only be required. But these parties shall provide the address of their office at the State Level.

(4) (*a*) The application under sub-paragraph (1) above shall be accompanied by a copy of the memorandum, or rules and regulations of the association or body by whatever name called, duly signed by the President, Secretary and three other founder members, and such memorandum or rules and regulations shall contain a specific provision that the association or body shall bear true faith and allegiance to the Constitution of India as by law established, and to the principles of socialism, secularism and democracy, and would uphold the sovereignty, unity and integrity of India :

Provided that in case of a recognised political party a copy of the memorandum or rules and regulations may be signed by any three members of executive committee of the political party at the National or State Level.

The memorandum rules and regulations shall also contain the democratic procedure by which the President, Secretary, Treasurer and other office-bearers shall be elected and their term of office.

(*b*) In the case of a political party already registered with the Election Commission of India, the application shall be accompanied by the documentary evidence of its registration with the Election Commission of India, particulars of Symbol and a certified copy of the party constitution, by whatever name called.

(5) The application shall also be accompanied by a declaration to the effect that the applicant has read and understood the provisions of this Order and that the political party sought to be registered by him shall abide by the provisions of this Order.

(6) The application shall be accompanied by a demand draft of Rs. 5,000 (Rupees Five Thousand only) payable at Mumbai drawn in favour of Assistant Commissioner, State Election Commission, Maharashtra, Mumbai.

(7) The Commission may call for such other particulars, as it may deem fit, from the association or body or political party.

(8) After considering all the particulars as aforesaid in its possession, and any other necessary and relevant factors and after giving the representatives of the association or body or political party, a reasonable opportunity of being heard, the Commission shall either register the association or body or political party, as a political party for the purposes of this Order, subject to such restrictions and conditions as may, by order, be specified by the Commission ; or may take a decision not so to register it ; and the Commission shall communicate its decision to the association or body or political party :

Provided that, no association or body or political party shall be registered as a political party under this sub-paragraph unless the memorandum or rules and regulations of such association or body or the constitution of the political party conform to the provisions of sub-paragraph (4) above.

(9) (*i*) Before registering a political party under this order a notice shall be published in the *Maharashtra Government Gazette* indicating therein the name and address of the political party, its President and Symbol proposed to be allotted, if any, and calling for objections, if any, for such registration from the general public :

Provided that in case of a recognised political party, no such notice needs to be published.

(*ii*) If no objection is received within 30 days from the date of publication in *Maharashtra Government Gazette* as specified in sub-para (i) above, it shall be competent for the State Election Commission to register the political party as proposed in the notice.

(*iii*) If any objection is received, the State Election Commission may consider the same and in case it is found to be flimsy, it may reject the same and register the political party ; if on the other hand, the State Election Commission considers that the objection is *prima facie* genuine, then the same shall be communicated to the applicant and his remarks shall be called for. After receipt of the remarks, the Commission may either decide the matter on merits on the basis of the records available or it may give personal hearing to the parties concerned and take a decision thereafter. The decision of the State Election Commission shall be final.

(*iv*) Every Association or Body of individual citizens making an aplication under this order for registration of political party shall take care to see that the name of the political party proposed to be registered should not resemble the name of a political party which is already registered with the State Election Commission, thus giving rise to a confusion in the minds of the general public. Where the State Election Commission is either *suo moto* or no objections received from the general public considers that the name of a political party sought to be registered is similar to that of a political party already registered, it shall be competent to the Commission to reject the application. It shall, however, be open to the applicant to make a fresh application by changing the name of the political party and any such application will be examined *de-novo* as if it is a new application. The decision of the State Election Commission shall be final.

(10) After an association or body or political party has been registered as a political party as aforesaid,—

(*a*) any change in its name, head office, office-bearers, address or in any other material matters shall be communicated to the Commission without delay :

Provided that before making any change in its name, permission from the Commission shall be taken accordingly :

(*b*) such association or body or political party shall maintain true accounts of its income and expenditure, and particularly maintain separate accounts for the expenditure incurred in connection with local body elections, indicating details of the expenditure incurred on the general publicity of the party, and candidate-wise expenditure incurred for promoting the election of specific candidates set-up or supported by the party in various elections to local bodies ;

(*c*) a copy of the annual audited accounts of the party and a copy of the income-tax returns filed under the law for the relevant year shall be filed in the office of the Commission within a period of one year after the end of the relevant financial year ;

(*d*) the provision of the Model Code of Conduct for Local body Elections issued from time to time by the Commission should be observed ;

(*e*) the directions and instructions of the Commission, given from time to time, with a view to furthering the conduct of free, fair and peaceful election or safeguarding the interests of the general public and electorate in particular should be followed.

**4. Cancellation of registration of political party.—**(1) Notwithstanding in this order, if the Commission, either *suo motu*, or upon an application received in that behalf, has a reason to believe that,—

(*a*) a registered party is not complying with the provisions of this Order ; or

(*b*) that the Model Code of Conduct for the elections of local bodies (as amended from time to time) is not being observed in toto, or

(*c*) that the directions and instructions issued by the Commission from time to time, for the conduct of free, fair and peaceful elections and for safeguarding the interests of the general public and electorate in particular are not complied with, or

(*d*) defiance is shown to the Model Code of Conduct and instructions thereof,

The Commission, after considering all available facts and circumstances of the case and after giving such party a roasonable opportunity of showing cause in respect of the action proposed to be taken against it, if satisfied that the explanation given by the Party is not sufficient, it may cancel the registration of such party and remove its name from the list of registered political parties.

(2) If a registered political party makes an application to the Commission for cancellation of its registration and if the Commission is satisfied that such proposal is passed by majority of the members of that party, the Commission may cancel the registration of such political party.

**5. Powers of Commission to issue instructions.—**The Commission, may issue instructions and directions,—

(*a*) for clarification of any of the provisions of this order ;

(*b*) for removal of any difficulty which may arise in relation to the implementation of any such provisions ; and

(*c*) in relation to any matter with respect to the registration of political parties, for which this Order makes no provision or makes insufficient provision, and provision is in the opinion of the Commission nocessary for the smooth and orderly conduct of elections.

*ANNEXURE-I*

**PROFORMA OF APPLICATION FOR REGISTRATION AS A POLITICAL PARTY**

(for Recognised Political Parties)

To,

The Principal Secretary/Secretary,

State Election Commission,

1st Floor, New Administrative Building,

Opp. Mantralaya, Madam Cama Road,

Mumbai 400 032.

Sir,

It is requested that ............................................................ (Name of the Political Party) may be registered as a Political Party under the Maharashtra Registration of Political Parties Order 2009 of the State Election Commission, Maharashtra. The particulars required under that Order are furnished as under :—

(*1*) Name of the Political Party ;

(*2*) The Address of its Head Office ;

(*3*) The Address of its office at State level ;

(*4*) The Address to which letters and other communications should be sent ;

(*5*) The names of its President, Secretary, Treasurer and other office bearers.

(2) Following documents/particulars are enclosed—

(*i*) A demand draft of Rs. 10,000 (Rupees Ten Thousand only) on account of processing fee drawn in favour of the ' Assistant Commissioner, State Election Commission, Maharashtra, Mumbai ' and payable at ' Mumbai '.

(*ii*) A copy of party Constitution/Memorandum, Rules and Regulations duly signed by any three members of the Executive organ of the Political Party at the National or State level. It has in it a specific provision that the party shall ' bear true faith and allegiance to the Constitution of India as by law established and to the principles of socialism, secularism and democracy and would uphold the sovereignty, unity and integrity of India.

It also provides for the democratic procedure by which the President, Secretary, Treasurer and other office bearers shall be elected and their term of office.

(*iii*) Documentary evidence of its registration with the Election Commission of India and a copy of notification showing allotment of symbol (if symbol is allotted).

(*iv*) A Declaration as specified in Annexure III.

Yours Faithfully,

Place :

Date :

General Secretary/Chairman/
President of the Party.

*ANNEXURE-II*

**PROFORMA OF APPLICATION FOR REGISTRATION AS A POLITICAL PARTY**

(for Association/Body/Political party other than Recognised Political Parties)

To,

The Principal Secretary/Secretary,
State Election Commission,
1st Floor, New Administrative Building,
Opp. Mantralaya, Madam Cama Road,
Mumbai 400 032.

Sir,

It is requested that ............................................................ (Name of the Association/Body/ Political Party) may be registered as a Political Party under the Maharashtra Registration of Political Parties Order, 2009 of the State Election Commission, Maharashtra. The particulars required under that Order are furnished as under :—

(*a*) Name of the Association/Body/Political Party ;

(*b*) The Address of its Head Office ;

(*c*) The Address of its Office at State level ;

(*d*) The Address to which letters and other communications should be sent ;

(*e*) The names of its President, Secretary, Treasurer and other office bearers with a copy of Resolution of their election.

(*f*) The numerical strength of its Members and if there are categories of its Members, the numerical strength in each category ;

(*g*) The names of at least 150 Members, their category and recently certified details about their names in electoral roll ;

(*h*) Whether it has any branch (local unit) ; if so at what level ?

(*i*) Wheher it is represented by any office bearer or members in any of the local bodies in the State ; if so, their number, names of such local bodies and number of such members in each these bodies ;

(*j*) Date of formation of the Association/Body/Political party ;

(*k*) The principles on which the asscciation/Body/Political party is based ;

(*l*) The plicies, aims and object, pursued or seeks to pursue ;

(*m*) Its programme, functions and activities for the purpose of carrying out its principles, policies, aims and objects.

(2) Following documents/particulars are enclosed—

(*i*) A demand draft of Rs.10,000 (Rupees TEN Thousand only) on account of processing fee drawn in favour of the ' Assistant Commissioner, State Election Commission, Maharashtra, Mumbai ' and payable at Mumbai.

(*ii*) A coppy of party Constitution/Memorandum, Rules and Regulations duly signed by any three members of the Executive organ of the Political Party at the National or State level. It has in it a specific provision that the party shall dear true faith and allegiance to the Constitution of India as by law established and to the principles of socialism, secularism and democracy and would uphlod the sovereignty, unity and integrity of India.

It also provides for the democratic procedure by which the President, Secretary, Treasurer and other office bearers shall be elected and their term of office.

(*iii*) A Declaration as specified in Annexure III.

Yours Faithfully,

Place :

Date :

General Secretary/Chairman/
President of the Party.

*ANNEXURE-III*

**PROFORMA OF DECLARATION**

*DECLARATION*

To,

The Principal Secretary/Secretary,

State Election Commission,

1st Floor, New Administrative Building,

Opp. Mantralaya, Madam Cama Road,

Mumbai 400 032.

I, ........................................................................................ (Name of the Applicant) on behalf of ............................................................ (Name of the Association/Body/Political party) do hereby declare that I have read and understood the provisions of the Maharashtra Registration of Political Parties Order, 2009 and the abovementioned party in the event of its registration as a political party by the State Election Commission, Maharashtra shall—

(*1*) bear true faith and allegiance to the Constitution of India as by law established and to the principles of socialism secularism and democracy and would uphold the sovereignly, unity and integrity of India ;

(*2*) observe and abide by the provisions of the Model Code of Conduct issued by the State Election Commission, Maharashtra, for Local Body Election as amended from time to time, and the provisions of this Order ;

(*3*) follow or carry out the lawful directions and instructions of the Commission given from time to time with a view to furthering the conduct of free, fair and peaceful elections or safeguarding the interests of the general public and electorate in particular ;

(*4*) convey to the State Election Commission, Maharashtra without delay about any change in the name of the party address of its head office and state office, names of its office bearersat National and State level or any other material matters ;

Any change in the name of the party shall be made after obtaining prior permission of the State Election Commission, Maharashtra ;

(*5*) inform the State Election Commission, Maharashtra and concerned Returning Officers appointed for elections to local self governing bodies in the State, the names and specimen signatures of the authorised persons who would intimate names of candidates set up by the political party.

I further declare that the information submitted by me is true to the best of my knowledge and belief and that nothing material has been concluded therefrom.

Sd/-

Place :

Date :

General Secretary/Chairman/
President of the Party.

NAND LAL,
State Election Commissioner,

Maharashtra.

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२,

दिनांक ३१ मार्च २००९

**आदेश**

**महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९.**

भारतीय संविधानाच्या भाग नऊ व नऊ (अ) अनुसार गठित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक चिन्हांचे आरक्षण व वाटप व इतर अनुषंगिक बाबींविषयीचे आदेश.

क्रमांक एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का. ११.—ज्याअर्थी, भारताच्या संविधानाने राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्यातील पंचायती व नगरपालिकांच्या निवडणुका घेणे व अशा निवडणुका मुक्त, निःपक्षपातीपणे, पारदर्शकतेने आणि प्रभाविपणे पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय पक्षांना चिन्हांचे विनिर्देश, आरक्षण, निवड व वाटप यासंबंधी व इतर अनुषंगिक बाबींची तरतूद करणे आवश्यक झाल्यामुळे; राज्य निवडणूक आयोगाने, आदेश क्रमांक एसईसी/जीइएन. २०००/सीआर-६०/का-१०, दिनांक २९ सप्टेंबर २००६ रोजी निर्गमित केलेले, महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण वाटप) आदेश, २००६ अन्वये (त्या आदेशात वेळोवेळी सुधारणा केल्यानुसार) राज्यातील पंचायती व नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी निवडणूक चिन्हांचे आरक्षण व वाटप याबाबत आणि त्यासंबंधी इतर तरतुदी केल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर आदेशामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे अशी आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी, आता, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-२४३ के व २४३ झेडए व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम ९अ व महाराष्ट्र जिल्हा परिषद (निर्वाचक गट व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ (१) व महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ (१), मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई तीन) च्या कलम १८-ए चे पोट-कलम (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ चे पोट-कलम (४), नागपूर शहर महानगरपालिक अधिनियम, १९४८ (१९५० चा सी.पी. एन्ड बेरार २) च्या कलम ९ ब चे पोट-कलम (४) व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम १०-ए चे पोट-कलम (४) महाराष्ट्र नगर परिषद व नगरपंचायत निवडणूक नियम, १९६६ च्या नियम १६ चे पोट-नियम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व याबाबत सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचे व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकी संबंधीचे आरक्षण व चिन्हांचे वाटपासंबंधीचे अगोदरचे सर्व आदेश अधिक्रमित करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र याद्वारे खालील आदेश देत आहे.——

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रयुक्ती व प्रारंभ.——** (१) या आदेशास महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ असे म्हटले जाईल.

(२) त्याची व्याप्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यभर राहील व जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकांना तो लागू राहील.

(३) सदर आदेश **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या तारखेपासून अंमलात येईल.

२. **व्याख्या व निर्वाचन.——** या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " आयोग " म्हणजे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये गठित राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र ;

(२) " निर्वाचन क्षेत्र " म्हणजे जिल्हा परिषदेचा मतदार गट, पंचायत समितीचा मतदार गण व महानगरपालिकेचा, नगरपरिषदेचा किंवा यथास्थिती नगरपंचायतीचा प्रभाग ;

(३) " लढविण्यात येणारी निवडणूक " म्हणजे ज्या निवडणुकीत जिल्हापरिषद मतदार गट, पंचायत समिती मतदार गण व महानगरपालिका, नगरपरिषद किंवा नगरपंचायतीचा प्रभाग जेथे सार्वत्रिक अथवा पोट-निवडणुकांसाठी मतदान घेण्यात येते अशी निवडणूक ;

(४) " निवडणूक " म्हणजे सार्वत्रिक निवडणूक किंवा पोट-निवडणूक ज्यास हे आदेश लागू आहेत ;

(५) " सार्वत्रिक निवडणूक " म्हणजे हा आदेश लागू झाल्यानंतर राज्यात जिल्हा परिषदा, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषद किंवा नगरपंचायती स्थापन करण्याच्या प्रयोजनाकरिता घेतलेली कोणतीही सार्वत्रिक निवडणूक ;

(६) " स्थानिक स्वराज्य संस्था " म्हणजे,—

(अ) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये गठित जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती ;

(ब) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये गठित नगरपरिषद किंवा नगरपंचायत ;

(क) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अन्वये गठित मुंबई महानगरपालिका ;

नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये गठित नागपूर महानगरपालिका ; किंवा

(इ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये गठित करण्यात आलेली कोणतीही महानगरपालिका ;

(७) " मान्यताप्राप्त राजकीय पक्ष " म्हणजे भारत निवडणूक आयोगाद्वारे काढण्यात आलेल्या निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, १९६८, आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा अन्वये राजकीय पक्ष म्हणून मान्यता मिळालेला आणि तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदविण्यात आलेला राष्ट्रीय पक्ष किंवा राज्यस्तरीय पक्ष ;

(८) " नोंदणीकृत राजकीय पक्ष " म्हणजे आयोगाकडे नोंदणी करण्यात आलेला भारतीय नागरिकांचा संघ/समूह.

(९) या आदेशात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व वाक्यप्रयोग यांना राज्यातील सध्या अस्तित्त्वात असणाऱ्या कोणत्याही अधिनियमात किंवा त्याअन्वये तयार केलेल्या नियमाद्वारे जे अर्थ दिले असतील तेच अर्थ प्राप्त होतील.

**३. चिन्हांचे वाटप.——** लढविण्यात येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराला या आदेशातील तरतुदींनुसार चिन्हाचे वाटप करण्यात येईल, व एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविणाऱ्या वेगवेगळ्या उमेदवारांना वेगवेगळ्या चिन्हांचे वाटप करण्यात येईल.

**४. चिन्हांचे वर्गीकरण.——** (१) या आदेशाच्या प्रयोजनार्थ चिन्हे आरक्षित असतील किंवा मुक्त असतील.

(२) या आदेशात अन्यथा तरतूद असेल त्या व्यतिरिक्त आरक्षित चिन्ह हे मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत उमेदवारासाठी आरक्षित असेल.

(३) आरक्षित चिन्हांव्यतिरिक्त इतर चिन्हे ही मुक्त चिन्हे असतील.

**५. नोंदणीकृत राजकीय पक्षाचे वर्गीकरण.——** या आदेशाच्या प्रयोजनांकरिता व आवश्यकतेनुसार आयोग विनिर्दिष्ट करील अशा इतर प्रयोजनांकरिता राजकीय पक्ष हा मान्यताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष असेल.

ह्या आदेशांच्या प्रयोजनांकरिता " अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष " याचा अर्थ, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाव्यतिरिक्त, आयोगाकडे नोंदविण्यात आलेला कोणताही पक्ष असा आहे.

**६. राष्ट्रीय पक्ष आणि राज्य पक्ष यांच्यातर्फे उभ्या केलेल्या उमेदवारांसाठी चिन्हांची निवड व वाटप.——** (१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीला मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्षाद्वारे उभा करण्यात आलेल्या उमेदवारास भारत निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित केलेल्या चिन्हाची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करण्यात येईल आणि इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

(२) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीला मान्यताप्राप्त राज्य पक्षाद्वारे उभ्या करण्यात आलेल्या उमेदवारास, जरी तो पक्ष राज्यातील पक्ष असो किंवा नसो, भारत निवडणूक आयोगाद्वारे त्या पक्षाकरिता आरक्षित केलेल्या चिन्हांची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करण्यात येईल आणि इतर कोणतेही चिन्ह दिले जाणार नाही.

परंतु असे की, महाराष्ट्र राज्यात राज्य पक्ष म्हणून मान्यताप्राप्त असलेल्या पक्षास त्यांच्याकरिता आरक्षित असलेले चिन्ह देण्यात येईल.

परंतु आणखी असे की, जर महाराष्ट्र राज्याबाहेरील एकापेक्षा अधिक राज्यांतील मान्यताप्राप्त राज्य पक्षांकरिता विविध राज्यात समान चिन्हे आरक्षित करण्यात आली असतील तर राज्य निवडणूक आयोग अशा राज्य पक्षांपैकी ज्या पक्षाचा, महाराष्ट्र राजकीय पक्षांची नोंदणी आदेश, २००९ च्या परिच्छेद ३ नुसार नोंदणीसाठी अर्ज राज्य निवडणूक आयोगाकडे प्रथम प्राप्त झाला असेल, फक्त त्याच पक्षाला त्या आरक्षित चिन्हांचे वाटप करील व त्यानंतर नोंदणी अर्ज करणाऱ्या इतर राज्य पक्षांना त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या चिन्हांव्यतिरिक्त इतर चिन्हांचे वाटप करील.

(३) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कोणत्याही निवडणुकीत, मान्यताप्राप्त राजकीय पक्षाद्वारे निवडणुकीला उभा करण्यात आलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त कोणत्याही इतर उमेदवारास, जरी अशा निवडणुकीत अशा पक्षाद्वारे निवडणुकीली उमेदवार उभा केला नसेल तरी अशा पक्षाकरिता आरक्षित करण्यात आलेल्या चिन्हांची निवड करता येणार नाही किंवा वाटप केले जाणार नाही.

**७. पूर्वी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष असलेल्या व आता अमान्यताप्राप्त असलेल्या पक्षांनी उभ्या केलेल्या उमेदवारांना चिन्ह वाटपासंदर्भात द्यावयाची सवलत.——** जर एखादा पक्ष आता अमान्यताप्राप्त पक्ष असेल, तथापि निवडणुकीच्या तारखेच्या घोषणेपूर्वी ६ वर्षे अगोदर असा पक्ष राष्ट्रीय किंवा महाराष्ट्रातील राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त होता अशा पक्षाने उभ्या केलेल्या उमेदवारांना जिल्हा परिषद, पंचायत समिती, महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांमध्ये, त्या पक्षास, तो पक्ष ज्यावेळी राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्ष म्हणून मान्यताप्राप्त पक्ष होता, त्यावेळी जे चिन्ह आरक्षित केलेले होते, त्या पक्षाचे चिन्ह राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या मुक्त चिन्हांच्या यादीमध्ये नसले तरी ते चिन्ह आरक्षित करण्याबाबतची सवलत खालील अटीच्या पूर्ततेनंतर देता येईल :—

(क) राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यापासून एका आठवड्याच्या आत अशा पक्षाने त्यांच्यातर्फे उभ्या करण्यात येणाऱ्या उमेदवारांना आरक्षित चिन्ह मिळावे म्हणून आयोगाकडे अर्ज सादर केलेला असावा.

(ख) अशा उमेदवाराने त्यांच्या नामनिर्देशन पत्रामध्ये तो संबंधित पक्षातर्फे उभा असल्याबाबतची घोषणा केलेली असून, त्याने ह्या आदेशाच्या परिच्छेद ९ मधील तरतुदींची पूर्तता केलेली असावी.

(ग) अशाप्रकारे चिन्ह वाटप करण्याकरिताची विनंती अमान्य करण्यासाठी कोणतेही संयुक्तिक कारण नाही, असे राज्य निवडणूक आयोगाचे मत असेल :

परंतु उपरोक्त परिच्छेदामध्ये काहीही नमूद असले तरी, यापूर्वीच एखाद्या राष्ट्रीय किंवा राज्यस्तरीय पक्षासाठी चिन्ह राखीव ठेवण्यात आले असेल, तर या परिच्छेदातील तरतुदी लागू होणार नाहीत.

**८. नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे उभ्या केलेल्या उमेदवारांद्वारे किंवा इतर उमेदवारांद्वारे चिन्हांची निवड व चिन्ह वाटप.—** (१) राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही निवडणुकीस मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी उभ्या केलेल्या उमेदवारांव्यतिरिक्त उभ्या राहिलेल्या कोणत्याही उमेदवारास या परिच्छेदात यानंतर नमूद केलेल्या तरतुदीनुसार, आयोगाद्वारे मुक्त चिन्हे म्हणून विनिर्दिष्टित केलेल्या चिन्हांपैकी एका चिन्हाची निवड करता येईल व त्यानुसार वाटप करण्यात येईल.

(२) अशा निवडणुकीत एका उमेदवाराद्वारे जर एका मुक्त चिन्हाची निवड करण्यात आली, तर निवडणूक निर्णय अधिकारी/निवडणूक अधिकारी यांनी त्या चिन्हाचे उमेदवारास वाटप करावे व इतर चिन्ह देऊ नये.

(३) जर अशा निवडणुकीत अनेक उमेदवारांद्वारे एकाच मुक्त चिन्हाची निवड करण्यात आली आणि जर या अनेक उमेदवारांपैकी केवळ एक उमेदवार नोंदणीकृत राजकीय पक्षाद्वारे उभा केला असेल आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी ते मुक्त चिन्ह नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास देईल आणि इतर कोणासही नाही. जर या अनेक उमेदवारांपैकी दोन किंवा अधिक नोंदणीकृत राजकीय पक्षाचे उमेदवार असतील आणि उर्वरित अपक्ष उमेदवार असल्यास, निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यायचे ते ठरवील आणि ज्या उमेदवारांची चिठ्ठी येईल, त्या उमेदवारास त्या मुक्त चिन्हाचे वाटप करेल आणि इतर कोणासही नाही.

**९. एखाद्या उमेदवारास नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे केव्हा समजले जाईल.—** या आदेशाच्या प्रयोजनार्थ एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केल्याचे तेव्हा समजले जाईल जेव्हा,—

(१) उमेदवारानी त्याबाबत नामनिर्देशनपत्रात तशी घोषणा केलेली असेल तर,

(२) (अ) संबंधित मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास व संबंधित जिल्हाधिकाऱ्यास किंवा यथास्थिती महानगरपालिका आयुक्ताना तशी लेखी सूचना देण्यात आलेली असेल,—

(एक) उक्त लेखी सूचना ही महाराष्ट्र जिल्हा परिषद निर्वाचक विभागाच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी विहित केलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद (निर्वाचक विभाग व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेल्या नमुना " दोन अ " व " दोन ब " नुसार पाठविण्यात यावी ;

(दोन) उक्त लेखी सूचना ही पंचायत समिती निर्वाचक गणाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ विहित केलेल्या महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम १५अ नुसार विहित केलेल्या नमुना " दोन अ " व " दोन ब " नुसार पाठविण्यात यावी ;

(तीन) महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायती यांच्या निवडणुकीच्या बाबतीत उक्त लेखी सूचना व सूचनापत्र जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती महानगरपालिका आयुक्त यांना जोडपत्र एक व जोडपत्र दोन मध्ये विनिर्दिष्टित केल्याप्रमाणे पाठविण्यात यावी.

(ब) उक्त सूचनापत्रावर, पक्षाच्या अध्यक्ष, सचिव किंवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्याने, शाईने अथवा बॉलपेनने स्वाक्षरी केलेली असेल. अशा सूचना पत्रावर प्रतिरूप सही असलेली अगर रबर स्टॅम्पची सही असलेली अगर अन्य प्रकारे सही असलेले चालणार नाही. तसेच फॅक्सने अगर अन्य प्रकारेही सूचनापत्र पाठविता येणार नाही. अशा कुठल्याही अन्य प्रकाराने पाठविण्यात आलेली सूचनापत्रे जिल्हाधिकारी अगर निर्वाचन अधिकारी यांनी स्वीकारू नये ;

**१०. चिन्हांची सूची असलेली अधिसूचना.—** आयोग, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या, एक किंवा अधिक अधिसूचनाद्वारे खालील माहिती विनिर्दिष्टित करील.—

(अ) राष्ट्रीय पक्ष

(ब) राज्यस्तरीय पक्ष

(क) इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्ष आणि त्यांच्यासाठी राखून ठेवलेली चिन्हे

(ड) मुक्त चिन्हांची यादी.

**११. सूचना देण्याचे आयोगाचे अधिकार.—** आयोग खालील बाबतीत सूचना व निदेश देऊ शकेल :—

(अ) या आदेशातील कोणत्याही तरतुदी बाबतच्या स्पष्टीकरणाकरिता ;

(ब) अशा कोणत्याही तरतुदीची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात उत्पन्न झालेल्या कोणत्याही अडचणी दूर करण्याकरिता ;

(क) निवडणूक चिन्हे आरक्षित ठेवणे व राजकीय पक्षांना त्यांचे वाटप करणे या संबंधात ह्या आदेशात तरतूद करण्यात आली नसेल किंवा करण्यात आलेली तरतूद अपूर्ण असेल तेव्हा ; आणि निवडणुका सुरळीत व सुस्थितीत पार पाडण्यास आयोगास आवश्यक वाटतील अशा योग्य त्या तरतुदी करणे आवश्यक आहे असे आयोगाचे मत झाल्यास.

## जोडपत्र १

**राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींबाबत द्यावयाचे सूचनापत्र.**

**( केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी लागू )**

प्रति,

(१) महानगरपालिका आयुक्त, ..................... महानगरपालिका

(२) जिल्हाधिकारी, ..................... जिल्हा

(३) निवडणूक निर्णय अधिकारी,

प्रभाग क्र. ....................., ................................ महानगरपालिका /नगरपरिषद / नगरपंचायत निवडणूक.

विषय :— सार्वत्रिक / पोट निवडणूक ..................... महानगरपालिका/नगरपरिषद/नगर पंचायत,
जिल्हा ...........................
चिन्ह वाटपासाठी उमेदवारांची नावे कळविण्याचे दृष्टीने व्यक्तींना प्राधिकृत करणेबाबत.

महोदय,

मी, याद्वारे ..................... हा पक्ष, जो राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष / राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष/नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्ष असून, वरील निवडणुकीसाठी सदर पक्षाद्वारे पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींची नावे खालीलप्रमाणे कळवू इच्छितो :—

| सूचनापत्र पाठविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव/व्यक्तींची नावे<br>(१) | पक्षामध्ये धारण करीत असलेले पद<br>(२) | प्रभाग क्र. ..................... महानगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायत याबाबत प्राधिकृत<br>(३) |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

२. वर नमूद केलेल्या व्यक्तींची/व्यक्तींच्या नमुना स्वाक्षऱ्या खालीलप्रमाणे आहेत :—

(१) श्री. ............................. यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) ............................. (ब) .........................

(क) .............................

(२) श्री. ............................. यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) ............................. (ब) .............................

(क) .............................

(३) श्री. ............................ यांची

नमुना स्वाक्षरी

(अ) ............................ (ब) ............................

(क) ............................

आपला विश्वासू,

अध्यक्ष/सचिव.

(शाईची अथवा बॉलपॉईंट पेनची स्वाक्षरी)

पक्षाचे नाव

पक्षाची मुद्रा

(सील)

ठिकाण :

तारीख :

---

**टीपः—**सदर सूचनापत्रावर पक्षाचे अध्यक्ष, सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपॉईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.

भाग एक-अ (म.उ.वि.)—२२—४

(शा.म.मु.) वाय १८६१अ—४ (२००–११–२०१६)

## जोडपत्र २

### राजकीय पक्षांतर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे कळविणारे सूचनापत्र

### ( केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी लागू )

प्रति

(१) महानगरपालिका ..................... आयुक्त, महानगरपालिका

(२) जिल्हाधिकारी, ..................... जिल्हा

(३) निवडणूक निर्णय अधिकारी,

प्रभाग क्र. ....................., ................................ महानगरपालिका /नगरपरिषद / नगरपंचायत.

विषय :— ..................... महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूक,

जिल्हा ........................... उमेदवार उभे करणेबाबत.

महोदय,

..................... पक्षातर्फे प्रभाग क्रमांक ..................... महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत ..................... या सार्वत्रिक / पोट निवडणुकीमध्ये उभे करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे मी खालीलप्रमाणे कळवू इच्छितो :—

| प्रभागाचे नाव/क्रमांक | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराच्या वडिलांचे/पतीचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराचा पोष्टाचा पत्ता | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नामनिर्देशन छाननीमध्ये रद्द झाल्यास त्याची जागा घेणाऱ्या पर्यायी उमेदवाराचे नाव | पर्यायी उमेदवाराच्या वडिलांचे/पतीचे नाव | पर्यायी उमेदवाराचा पोस्टाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | | | | |

आपला विश्वासू,

ठिकाण :

नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी.

तारीख :

(शाईची अथवा बॉलपॉईंट पेनची स्वाक्षरी)

पक्षाचे नाव

पक्षाची मुद्रा

(सील)

**टीपः—**(१) सदर सूचनापत्रावर पक्षाचे अध्यक्ष, सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपॉईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.

(२) सदर सूचनापत्र नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३-०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पोहोचविणे आवश्यक आहे.

**नन्द लाल,**

राज्य निवडणूक आयुक्त,

महाराष्ट्र.

# STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Opposite Mantralaya,
Madam Cama Road, Mumbai 400 032.
Dated the 31st March 2009.

Order

MAHARASHTRA ELECTION SYMBOLS (RESERVATION AND ALLOTMENT) ORDER, 2009.

An order to provide for reservation and allotment of symbols for the elections to Panchayats and Municipalities constituted under Part-IX and IX-A of the Constitution of India.

No. SEC/RPP-2009/CR-49/D-11.—Whereas, the superintendence, direction and control of all elections to the Panchayats and Municipalities in the State are vested in the State Election Commission, Maharashtra by the Constitution of India ;

And whereas, in the interest of holding elections to the Panchayats and Municipalities in the State and Conduct of such elections in free, fair, transparent and effcient manner, it was expedient to provide for certain matters incidental to the specification, reservation, choice and allotment of symbols for political parties and for matters connected therewith and therefore; the State Election Commission, Maharashtra by it's Order No. SEC/GEN-2000/CR-60/D-10, dated the 29th September 2006 as amended form time to time, made certain provisions with regard to reservation and allotment of symbols for the elections to the Panchayats and Municipalities ;

And whereas, the Commission is satisfied that it is expedient to amend the said Order ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Article 243-K and 243-ZA of the Constitution of India, read with section 9A of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962 ) and sub-rule (*1*) of rule 15A of the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Elections ) Rules, 1962 and sub-rule (*1*) of rule 15A of the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Elections) Rules, 1962 sub-section *(4)* of Section 18A of the Mumbai Municipal Corporation Act, 1888 ( Bom. III of 1888 ), sub-section (*4*) of Section 14 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 ( Bom. LLX of 1949 ), sub-section *(4)* of section 9B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C. P. and Berar II of 1950) and sub-sections *(4)* of section 10A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965, read with sub-rule (*1*) of rule 16 of the Maharashtra Municipal Councils and Nagar Panchayats Election Rules, 1966 and of all other powers enabling it in this behalf and in supersession of it's all previous orders' regarding the reservation and allotment of symbols in the elections to the Zilla Parishads, Panchayat Samitis, Municipal Corporations, Municipal Councils and Nagar Panchayats in the State, the State Election Commission, Maharashtra, hereby makes the following order :—

**1. Short title, extent, application and commencement.—**(1) This Order may be called the Maharashtra Election Symbols (Reservation and Allotment.) Order, 2009.

(2) It extends to whole of the State of Maharashtra and applies in relation to elections to Zilla Parishads, Panchayat Samitis, Municipal Corporations, Municipal Councils and Nagar Panchayats.

(3) It shall come into force on the date of it's publication in the *Official Gazette.*

**2. Definitions and Interpretation.—**In this Order, unless the context, otherwise requires,—

(1) " commission " means the State-Election Commission, Maharashtra constituted under Article 243-K and 243-ZA of the Constitution of India ;

(2) " constituency " means an electoral division of the Zilla Purishad, electoral college of the Panchayat Samiti, ward of the Municipal Corporation, the Municipal Council or the Nagar Panchayat, as the case may be ;

(3)" contested election " means an election or bye-election in an electoral division of the Zilla Palrishad, electoral college of the Panchayat Samiti, ward of the Municipal Corporation, the Municipal Council or the Nagar Panchayat where poll is taken ;

(4) " **election** " means general election or bye-election to which this Order applies ;

(5) " **general election** " means any general election, held after the commencement of this Order, for the purpose of constituting a Zilla Parishad, Panchayat Samiti, Municipal Corporation, Municipal Council or Nagar Panchayat in the State ;

(6) " **local body** " means,—

(*a*) a Zilla Parishad or a Panchayat Samiti constituted under the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961;

(*b*) a Municipal Council or Nagar Panchayat constituted under the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act, 1965 ;

(*c*) Mumbai Municipal Corporation constituted under the Mumbai Municipal Corporation Act, 1888 ;

(*d*) Nagpur Municipal Corporation constituted under the City of Nagpur Corporation Act, 1948 ; or

(*e*) any other Corporation constituted under the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 ;

(7) " recognised political party" means a political party recognised as a National Party or as a State Party under the Election Symbols (Reservation and Allotment) Order, 1968, as amended from time to time, issued by the Election Commission of India and which is also registered with the State Election Commission ;

(8) " registered political party " means an association or body of individual citizens of India registered with the State Election Commission ;

(9) Words and expressions used but not defined in this Order but defined in the relevant Acts governing the elections to a local body or the rules made thereunder shall have the meanings respectively assigned to them in the relevant Acts and Rules.

**3. Allotment of symbols.—**In every contested election, a symbol shall be allotted to a contesting candidate accordance with the provisions of this Order and different symbols shall be allotted to different candidates contesting an election in the same constituency.

**4. Classification of symbols.—**(1) For the purpose of this Order, symbols shall be either reserved or free ;

(2) Save as otherwise provided in this Order, a reserved symbol is a symbol which is reserved for a recognised, political party for exclusive allotment to contesting candidates set up by that party ;

(3) All symbols other than reserved symbols are free symbols.

**5. Classification of registered political parties.—**For the purposes of this Order and for such other purposes as the Commission may specify as and when necessity therefor arises, political parties are either recognised political parties or unrecognised political parties.

For the purposes of this Order an "un-recognised political party" means a party registered with the Commission other than a recognised political party.

**6. Choice of symbol by candidates of National and State Parties and allotment thereof.—**(1) A candidate set up by a recognised National Party at any election to the local bodies in the State shall choose, and shall be allotted, the symbol reserved for that party by the Election Commission of India and no other symbol.

(2) A candidate set up by a recognised State Party at any election to the local bodies in the State, whether such party is a State Party in the State or not, shall choose, and shall be allotted the symbol reserved for that party by the Election Commission of lndia and no other symbol :

Provided that a State party recognised in the Maharashtra State shall get the symbol reserved for it :

Provided further that when more than one political party is recognized in States other than Maharashtra and have the same symbol, reserved in different States, the State Election Commission shall allot such reserved symbol only to that State Party whose application for registration under para 3 of the Maharashtra Registration of Political Parties Order, 2009, is first received by the Commission and the State Parties whose applications for such registration are received thereafter, shall be allotted symbols other than those reserved for them.

(3) In any election to the local bodies in the State, a reserved symbol shall not be chosen by, or allotted to any candidate other than a candidate set up by a recognised political party for whom such symbol has been reserved, even if no candidate has been set up by such party in such election.

**7. Concession to candidates set up-by an unrecognised political party which was earlier recognised as a National or State Party.—**If a political party, which is unrecognised at present but was a recognised Naitional Party or State Party in Maharashtra State not earlier than six years from the date of announcement, of election, set up a candidate at an election in a constituency in any Zilla Parishad, Panchayat Samiti, Municipal Corporation, Municipal Council or Nagar Panchayat, as the case may be, then such candidate may, to the exclusion of all other candidates in the constituency be allotted the symbol reserved earlier for that party when it was a recognised National Party *or* State Party in Maharashtra State, notwithstanding that such a symbol is not specified in the list of free symbols, on the fulfilment of each of the following conditions, namely :—

(*a*) that an application is made to the Commission by the Party for exclusive allotment of that symbol to the candidate set up by it, within a week after the declaration of the programme of election by the commission ;

(*b*) that the said candidate has made a declaration in his nomination paper that he has been set up by that party at an election and that the party has also fulfilled the requirements of paragraphs of this Order ;

(*c*) that in the opinion of the Commission, there is no reasonable ground for refusing the application for such allotment:

Provided that the provisions of this paragraph shall not apply where the same symbol is already reserved for some other National Party or State Party.

**8. Choice of symbols by candidates of registered political parties or other candidates and allotment thereof.—**(1) Any candidate at an election to local bodies in the State other than a candidate set up by recognised political party shall choose and shall be allotted in accordance with the provisions hereinafter set out in this paragraph one of the symbols specified as free symbols by the Commission.

(2) Where any free symbol has been chosed by only one candidate at such election, the returning officer/ election officer shall allot that symbol to that candidate and to no one else.

(3) Where the same free symbol has been chosen by several candidates at such election, then, if of those several, candidates only one is a candidate set up by registered political party, and all the rest are independent candidates, the returning officer shall allot that free symbol to the candidate,set up by the registered political party and to no one else, and if of those several candidates two or more are set up by different registered political parties and the rest are independent candidates, the returning officer shall decide by lot to which of the two or more candidates set up by the different registered political parties that free symbol shall be allotted and allot that symbol to the candidate on whom the lot falls and to no one else.

**9. When a candidate shall be deemed to be set up by *a* registered political party.—** *for the purpose of this order, a candidate shall be deemed tobe set up by a political party, if and only if,—*

(1) the candidate has made a declaration to that effect in his nomination paper ;

(2) *(a)* a notice in writing to that effect has been delivered to the Returning Officer of the constituency and the concerned Collector or Municipal Commissioner, as the case may be—

(*i*) the political party setting up candidate at any election to Zilla Parishad shall

communicate the names of the authorised persons in Form II-A prescribed under rule I5A of the Maharashtra Zilla Parishads (Electoral Divisions and Conduct of Election) Rules, 1962. Such authorised persons shall give notice of intimation of names of candidates in Form II-B of the said rules ;

(*ii*) the political party setting up candidate at any election to Panchayat Samiti shall communicate the names of the authorised persons in Form II-A prescribed under rule I5A of the Maharashtra Panchayat Samitis (Electoral Colleges and Conduct of Election) Rules, 1962. Such authorised persons shall give notice of intimation of names of candidates in Form II-B of the said rules ;

(*iii*) such notice and communication shall be sent to the Municipal Commissioner or, as the case may be, the Collector for the purpose of elections to the Municipial Corporations, Municipal Councils and Nagar Panchayats in the form prescribed in Annexure-I and Annexure-II respectively.

(b) The said notice shall be signed in ink pen or ball point pen by the President, Secretary or any other, officer who is authorised by the party to send such notice. A notice signed on behalf of the President, Secretary or the authorised person; or bearing a counter signature, or rubber stamp signature or signed in any other manner, or a notice sent by fax, shall not be permissible. A notice, which is not so permissible, shall not be accepted by the Collector or the Returning Officer.

**10. Notification containing list of symbols.—** The commission shall, by one or more notifications published in the *Official Gazette*, specify,—

(*a*) the National Parties ;

(*b*) the State Parties ;

(*c*) the parties from other States for which symbols have been reserved ;

(*d*) list of free symbols.

**11. Powers of Commission to issue instructions.—**The Commission, may issue instructions and directions,—

(*a*) for the clarification of any of the provision of this Order ;

(*b*) for the removal of any difficulty which may arise in-relation to the implementation of any such provisions ; and

(*c*) in relation to any matter with respect to the reservation and allotment of symbols to the recognised political parties, for which this order makes no provision or makes insufficient provision, and provision is in the opinion of the Commission necessary for the smooth and orderly conduct of elections.

*ANNEXURE I*

**Communication with regard to Authorised Persons to intimate Names of Candidates set up by the Political Party**

(applicable only to the elections of Municipal Corporations, Municipal Councils and Nagar Panchayats)

To,

1. The Municipal Commissioner, Municipal Corporation.........................................
2. The Collector, District .....................................
3. The Returning Officer, Municipal Corporation ..........................................
   for the ward (constituency) ...........................................................................................
   Municipal Council ..................................................

Sub.—General election/Bye-election to Municipal Corporation / Municipal Council/ Nagar Panchayat ................................. District .......................................Allotment of Symbols-Authorisation of persons to intimate names of candidates.

Sir,

I hereby communicate that the following person(s) has/have been authorised by the party, which is a National Party/ State Party /Registered unrecognised Political Party to intimate the names of the candidates proposed to be set by the party at the election cited above :—

| Name of Person authorised to send notice | Name of office held in the Party | Wards (Constituencies) of the ......... Municipal Corporation/Municipal Council/ Nagar Panchayat in respect of which he has been authorised |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| | | |

2. The specimen signature of the above mentioned person(s) so authorised are given below:—

(1) Specimen signature of Shri ..........................................................................
(i) .................................................. (ii) ............................................................
(iii) ................................................

(2) Specimen signature of Shri ..........................................................................
(i) .................................................. (ii) ............................................................
(iii) ................................................

(3) Specimen signature of Shri..........................................................................
(i) .................................................. (ii) ............................................................
(iii) ................................................

Yours faithfully,

Place : President /Secretary,

Date : (Signature in ink pen or ball point pen)

Name of Party

(Seal of the Party).

N.B.—The communication shall be signed by the President, Secretary or the Officer authoriaed by .................... the Party, in ink pen or ball pen.

*ANNEXURE II*

**Notice as to names of candidates set up by the Political Party**

(applicable only to the elections of Municipal Corporations,Municipal Councils and Nagar Panchayats)

To,

1. The Municipal Commissioner, Municipal Corporation..........................................
2. The Collector, District ......................................
3. The Returning Officer, Municipal Corporation ..........................................
for the ward (constituency) ..........................................................................................
Municipal Council ...................................................

Sub.—Election to Municipal Corporation /Municipal Council / Nagar Panchayat .............................................. District .................................

Setting up of Candidates

Sir,

I hereby give notice that the following persons have been set by ......................................... party as its candidates at the ensuing General Election / Bye-election from the Ward No. ........... of ........................ Municipal Corporation/Municipal Council / Nagar Panchayat, District ................. as noted against each ward.

| No. and/or Name of the Ward | Name of the Approved Candidates | Father's/ Husband's name of the Approved Candidate | Postal Address of the Approved Candidate | Name of the substitute candidate (Who) will ste-in, in the event of the approved candidate's nomination being rejected on scrutiny | Father's/ Husband's name of the substitute candidate | Postal address of substitute candidate |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| | | | | | | |

Place :

Date : Yours faithfully,

(Name and Signature of the authorised persons of the Party)
(Signature in ink pen or ball point pen)

Name of the Party
(Seal of the Party).

N.B.—(i) The communication shall be signed, by the President, Secretary or the Officer authorised by the Party, in ink pen or ball point pen.

(ii) This must be delivered to the Returning Officer not later than 3-00 p.m. on the last date for submitting nomination by the Candidate.

NAND LAL,
State Election Commissioner,
Maharashtra.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.